प्रकरण ६ वे

# उपसंहार

## प्रकरण ६ वे

# उपसंहार

"बाळ फोंडके यांच्या विज्ञान कथांचा चिकित्सक अभ्यास" ('खिडकीलाही डोळे असतात' व 'व्हर्च्युअल रिॲलिटी' च्या अनुषंगाने) या दोन विज्ञानकथा संग्रहाच्या आधारे त्यांच्या विज्ञानकथा लेखनाचा विचार या लघुशोधप्रबंधात केलेला आहे. इतर कथेपेक्षा बाळ फोंडके यांची विज्ञानकथा कोणकोणत्या बाबतीत वेगळी वाटते व त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये कोणती, तसेच कथालेखनातून कोणत्या वाङ्मयीन गुणवत्ता प्रकट होतात, ह्या गोष्टीचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेतून केलेला आहे.

मराठी वाङ्मयामध्ये प्रारंभापासून आतापर्यंत मराठी कथेचा विकास कसा झाला, कोणकोणत्या लेखकांनी मोलाची कामगिरी केली याचे विवेचन केलेले आहे. विज्ञानकथेचा प्रारंभ व विज्ञानकथांच्या विकासात विज्ञानकथाविषयक मासिके व नियतकालिकांनी केलेले योगदान तसेच मराठी विज्ञान परिषदेने केलेले कार्य, विज्ञान साहित्य परस्परसंबंध, विज्ञानकथेच्या प्रेरणा व वैशिष्ट्ये या विषयीचे विवेचन येथे केलेले आहे.

मराठी कथा वाङ्मयात ग्रामीण, दलित अशा कथाप्रवाहांप्रमाणे विज्ञानकथा हा एक नवा आणि स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व असणारा प्रवाह निर्माण झालेला दिसतो. मराठी कथेमध्ये हळुहळू विज्ञान कथेच्या पाऊलखुणा दिसू लागल्या. कथेच्या आशयामध्ये वेगळेपण जाणवू लागले व कथेतून वैज्ञानिक दृष्टी जाणवू लागली. विज्ञानालाच कथेचा आशय बनवले व एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून विज्ञानकथांचा उद्य झाला. विज्ञान कथेचे दालन समृद्‌ध व वैशिष्ट्यपूर्ण करण्यासाठी पहिल्या रांगेचे जे मानकरी विज्ञानकथाकार आहेत त्यांच्या विज्ञानकथांचे संक्षिप्त विवेचन या भागात आले आहे.

बाळ फोंडके यांच्या विज्ञान कथालेखनातील वैशिष्ट्यांचा शोध घेण्यासाठी मराठी कथेचा विचार करणे गरजेचे असल्यामुळे पहिल्या प्रकरणात मराठी कथेच्या वाटचालीचा आढावा घेतलेला आहे. मराठी कथेची वाटचाल पाहिली असता मराठी कथेने विविधरूपे धारण केलेली दिसतात.

विज्ञानकथेचे स्वरूप, संकल्पना व्याख्या व विकासांचा विचार, तसेच मराठी साहित्यातील विज्ञानकथाकार, मराठी विज्ञान कथेतील विज्ञान, मराठी विज्ञान साहित्य निर्मितीतील समस्या, विज्ञान कथेचे महत्त्व / गरज या घटकांचे विवेचन येथे केले आहे.

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात विज्ञान साहित्याला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. विज्ञान कथेच्या विकासाचे टप्पे सांगत असताना त्या कथेचे मुळही शोधण्याचा प्रयत्न या लघुशोधप्रबंधिकेमध्ये केलेला आहे. या विज्ञान कथेचे नाते दैवत कथांशी थोड्याफार प्रमाणात मिळते-जुळते होते. नवकथेनंतर सुरू झालेल्या विज्ञान प्रवाहाला प्रवाही बनविण्यासाठी अनेकांनी हातभार लावलेला आहे, त्याचा या प्रकरणात विचार केलेला आहे. विज्ञानकथेच्या विकासात जयंत नारळीकर, निरंजन घाटे, डॉ. बाळ फोंडके, सुबोध जावडेकर, अरूण साधू, लक्ष्मण लोंढे, द.व्य. जहांगीरदार, अविनाश कोलारकर, माधुरी शानभाग या विज्ञान कथाकारांनी मोलाची कामगिरी केलेली दिसते.

विज्ञानकथा ही भविष्याचा वेध घेते. हा वेध माणसाच्या वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानात्मक अनुभवाच्या आधारे, तर्कसंगत कल्पेनेने घेण्यात आलेला असतो. त्यामुळे विज्ञानकथेला भविष्यकालीन वाङ्मय म्हटले जाते. विज्ञानकथा हा विसाव्या शतकात कलावंताच्या कल्पनाशक्तीला त्रैलोक्यात संचार करायला लावणारा आणि सर्वात जास्त लोकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. अशा या वाङ्मय प्रकारच्या विज्ञान साहित्य निर्मितीस अनेक समस्या आहेत. त्या दूर करून विज्ञान साहित्याला प्रोत्साहन दिले पाहिजे.

विज्ञान कथेचे महत्त्व अनन्य साधारण आहे, म्हणून लोकांमध्ये वैज्ञानिक जागृती निर्माण करणे, अंधश्रद्धा नाहीशी करणे, त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे यासाठी विज्ञान साहित्याची गरज आहे, असे मला वाटते. तसेच विज्ञानाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी विज्ञानावर आधारित लेखन व वाचन यात वाढ होणे गरजेचे आहे, यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत.

या प्रकरणात विज्ञान साहित्य, विज्ञानकथाकार, विज्ञान कथेतील विज्ञान, विज्ञान साहित्याचे महत्त्व व गरज या घटकांचे विवेचन केले आहे.

बाळ फोंडके यांच्याविषयी व त्यांच्या वाङमयीन कार्याविषयी माहिती येथे दिलेली आहे. बाळ फोंडके यांनी वाचकांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी कथेचे माध्यम निवडून विज्ञानकथा

वाचकाभिमुख केल्याचे दिसते. त्यांच्या कथालेखनाच्या वैशिष्ट्यांचा विचार सदरप्रकरणात केलेला आहे.

प्रसिद्ध विचारवंत, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, नामवंत विज्ञान कथाकार, पत्रकार, संपादक अशा विविध भूमिका डॉ. बाळ फोंडके यांनी समर्थपणे केलेल्या आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व हे अष्टपैलू आहे. विज्ञानकथा केवळ काल्पनिक नसून वास्तवदर्शीही आहे, या धारणेने ते लेखन करतात. त्यांच्या कथामध्ये विज्ञानातील अनेक घडामोडी, शोध विज्ञान क्षेत्रात वावरणारी माणसे त्यांचे परस्पर संबंध, त्यांच्यातील हेवेदावे, सत्तास्पर्धा अशा विविध गोष्टीचे दर्शन होते. तसेच त्यांच्या विज्ञान कथांमध्ये वैज्ञानिकांच्या संशोधनाची पळवापळवी, त्यांचे पेटंट मिळविणे, कॉन्ट्रॅक्ट मिळविणे यासाठी चालणाऱ्या औद्योगिक क्षेत्रातील चढाओढी प्रसंगी शौर्याच्या अमानुष पातळीवर जातात. विज्ञानातील शोधांच्या वैज्ञानिकांच्या आयुष्यावर कोणता व कसा परिणाम होतो याचे चित्रण त्यांच्या कथांतून होते. तसेच इंग्रजी शब्दांचा अधिकाधिक वापर करणारे मराठी कथाकार म्हणून बाळ फोंडके यांच्याकडेच बोट दाखवावे लागेल. तसेच त्यांच्या विज्ञान कथेमध्ये भविष्यकाळात होणाऱ्या वैज्ञानिक प्रगतीच्या शक्यता वर्तविलेल्या दिसतात.

बाळ फोंडके यांनी विज्ञानातील काही प्रयोग कथेच्याद्वारे वाचकांना समजावून सांगितलेले दिसतात. तसेच विज्ञानकथेमधून विज्ञान सांगत असताना वाचकांचे प्रबोधन व मनोरंजनही करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. त्याचप्रमाणे विज्ञानातील वास्तवाचा मेळ मानवी भावनांशी जोडून कथेला वाङ्मयीन गुणवत्ता ते प्राप्त करून देतात. वाड़मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने व आशयाच्या दृष्टीने या कथा महत्वाच्या वाटतात.

बाळ फोंडके यांचे वाङ्मयीन चरित्र, त्यांच्या विज्ञानकथा लेखनामागील प्रेरणा व भूमिका, त्यांच्या कथालेखनाचे विशेष यांचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञान कथासंग्रहाची चिकित्सा ही या कथासंग्रहाची रचनाशैली, भाषाशैली, व्यक्तिचित्रणे, वेगळेपण, यातील विज्ञान या घटकांच्या साहाय्याने केली आहे. बाळ फोंडके यांच्या या कथासंग्रहात पोलिस कमिशनर अमृतराव व डॉ. कौशिक या महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा असून त्या सर्व कथांमध्ये वावरतात. या कथा वास्तवाशी जवळीक साधणाऱ्या आहेत. यामध्ये संवादाला महत्वाचे स्थान आहे व संवाद हे कथानकाला पुढे नेताना दिसतात. तसेच सर्व कथांमध्ये हिंदी-इंग्रजी शब्दांचा व संवादाचा सुरेख वापर केलेला आहे. यामधील कथा गूढ/रहस्यमय आहेत. वेगवेगळ्या वृत्ती - प्रवृत्तींच्या व्यक्तिरेखा या कथासंग्रहात

आढळतात. त्याचप्रमाणे कथानक विज्ञानाच्या अंगाने फुलविताना गूढ रहस्यमयतेचा आभास निर्माण करण्याचे कौशल्य यांच्या भाषाशैलीत आहे. त्यांच्या कथेत निवेदनाच्या माध्यमातून गूढ बाहेर पडते.

या कथांमध्ये आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान व वैज्ञानिक प्रगतीचा वापर केलेला आहे. यामध्ये

रेडिओकार्बन डेटिंग तंत्रज्ञान, स्पेक्ट्रोग्राफ मशीन, पेसमेकर मशीन, टेलिमेट्री तंत्रज्ञान, सेलफोन तंत्रज्ञान, स्लोग्लास खिडकीतील तत्त्वज्ञान, लेझर फिजिक्समधील होलोग्राम, कॉम्प्युटरवरील मेल तंत्रज्ञान, ऱ्होडोडेन्ट्रॉन झाडांमधील संवेदना, डी.एन.ए. तंत्रज्ञान, रॅपिड ॲलिफाईड पॉलिमॉर्फिक, डी.एन.ए.तंत्रज्ञान, इम्प्रिन्टिंग तंत्र, ऑप्टिकल ऍक्टिव्हटी टेस्ट, क्वान्टम् इलेक्ट्रोडायनॅमिक्स रिसर्च, रेडिएशन बायोकेमिस्टि सिस्टिम, फिंगरप्रिंट, पोस्टमार्टम इ. यांचा वापर करून कथा गुंफलेल्या आहेत.

'व्हर्च्युअल रिॲलिटी' या विज्ञान कथासंग्रहाची चिकित्सा ही या कथासंग्रहाची रचनाशैली, भाषाशैली, व्यक्तिचित्रण, वेगळेपण, यातील विज्ञान या विविध घटकांच्या साहाय्याने केली आहे. या कथासंग्रहाची भाषाशैली, रचनाशैली ही कथांना समर्पक अशी आहे.

मानवी अहंकार, जिद्द, मत्सर, लोभ, द्वेष, अशा षड्रिपुच्या आहारी गेल्यांनतर खून, मारामारी, फसवणूक अशा गोष्टी कशा घडतात यांचे दर्शन या कथांमध्ये होते. तसेच या कथासंग्रहातील कथांमध्ये वेगंवेगळ्या आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञानाच्या, शोधांचा वापर केलेला दिसतो. उदा. क्लोन, टेलोमेरेज, डी.एन.ए. फिंगरप्रिंट, चर्मवस्त्राचा शोध, टाईममशिन पेटंट, एडस् रोगावर औषध अशा वेगवेगळ्या विज्ञान विषयांमुळे बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथा प्रभावी ठरतात.

सध्या मराठी विज्ञान कथेने नवे रूप धारण केले. या तिच्या नव्या रूपाच्या जडणघडणीत बाळ फोंडके यांच्या कथांचा महत्वाचा वाटा आहे. त्यामुळे त्यांच्या कथांचा सखोल विचार करणे गरजेचे आहे. हा विचार करण्यापूर्वी प्रथमतः मराठी कथा वाङ्मयप्रकारचे रूप लक्षात घेतले आहे. नंतर मराठी विज्ञान कथेच्या विकासाचे टप्पे विचारात घेतले आहेत. विज्ञानकथा या वाङ्मय प्रकाराला जागतिक स्तरावरच शंभर दीडशे वर्षांची परंपरा आहे. मराठी वाङ्मयात हा वाङ्मयप्रकार गेल्या सत्तर पंचाहत्तर वर्षातच स्थिरावलेला दिसतो. या वर्षात मराठी विज्ञानकथा वाङ्मयाचा विकास पाहिला असता, विज्ञान कथेने विविध रूपे धारण केलेली दिसतात.

श्री. बा. रानडे यांनी विज्ञान कथा लेखनाला सुरूवात करून दिली. परंतु या कथा प्रकाराकडे वाचकांना आकृष्ठ करून विज्ञानकथेला लोकप्रिय करण्याचे श्रेय भा.रा. भागवत यांना आहे. तर नारायण धारपांनी विज्ञानकथेला नवे वळण देण्यात भर टाकली, द.पा. खांबेटे यांनी रहस्यमय कथेला बाजूला सारून उत्कंठापूर्ण कथा लिहल्या. गजानन क्षीरसागर, यशवंत रांजणकर यांनी अंशत:

विज्ञानकथेच्या विकासात भर टाकली. मात्र जयंत नारळीकर, निरंजन घाटे, लक्ष्मण लोंढे, बाळ फोंडके यांनी मराठी विज्ञानकथा समृद्ध केली. नारळीकरांच्या कथा लेखनामुळे विज्ञान कथेला वजन प्राप्त झाले. विज्ञान संशोधनातील त्यांचे अनुभव विश्व विज्ञान कथेतून साकार झालेले दिसते. विज्ञानकथा ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती उद्‌बोधकही असावी ही आग्रहाची भूमिका त्यांनी स्वीकारली व वाङ्मयीन गुणवत्ता प्रकट केली. त्यांच्या जोडीला त्याच तोलामोलाचा व विज्ञानकथेला सजग करणारा लेखक म्हणजे बाळ फोंडके होय. त्यांच्या कथेची वाङ्मयीन गुणवत्ता स्पष्ट करणे मला गरजेचे वाटते. त्यामुळे प्रस्तुत लघुशोध प्रबंधात बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथांचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

या लघुप्रबंधिकेतील या सहाव्या प्रकरणात सर्व प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेऊन समारोप केला आहे. प्रत्येक प्रकरणांचे निष्कर्ष व संदर्भ सूची शेवटी दिलेली आहे.